**शासन परिपत्रक दि. १७/१०/२०१५ अन्वये गठीत करण्यात आलेल्या समितीच्या बैठका इतिवृत्त इ.ची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याबाबत.**

| **अ.क्र** | **परिमंडळ/शाखा** | **समितीच्या उपस्थित सदस्यांची नावे.** | **बैठकीचा दिनांक.** | **पोलीस** ठाणे कोर्ट केस क्र गु.र.क्र/ कलम | **आरोपींची नावे** | **केस निर्दोष सुटल्याची कारणे** | **करण्यात आलेली/ करण्यात येत असलेली कार्यवाही** | **बैठकीचे इतिवृत्त ( स्वतंत्र कागदावर )** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** |
| **१** | अंमलबजावणी | १) श्री. राजेंद्र दाभाडे, पोउआ, अंमलबजावणी. (अध्यक्ष)<br>२)सपोआ श्री. तरडे<br>३) प्रभा राउळ, पोनि, समाज सेवा शाखा, (सदस्य)<br>३) श्रीमती. साक्षी लोडत विधी अधिकारी (सदस्य) | १९/०७/१७ | एमआयडीसी पोलीस ठाणे, वि.स्था. गुरक्र. ४४/१०, कलम ३,४,५,७ (१) (ब)अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६<br><br>५४००३१६/पीडब्ल्यु/११<br><br>५४ वे न्यायालय, शिवडी, मुंबई<br><br>निकाल दिनांक ३०/११/१८ | १) शांती सुरेश नाईक<br>२) शंकर चिकय्या पुजारी<br>'लारीका ब्युटीपार्लर ॲन्ड फॅमिली सलुन' चकाला अंधेरी मुंबई | १) पी. डब्ल्यु क्र.५ हेमंत राजकुंड या बोगस गिऱ्हाईकाने मुख्य तपासणीमध्ये आरोपींना ओळखले नाही.<br>२) पी. डब्ल्यु क्र.६ पंच प्रथमेश याने तो रस्त्याने जात असताना त्यास पोलिसांनी बोलावुन एका कागदावर त्याची सही घेतल्याचे सांगुन या व्यतिरिक्त त्यास काहीही माहिती नसल्याचे सांगितले.साक्ष दरम्यान सरकारी पक्षाने त्यास फितुर घोषित केले.<br>३) पी. डब्ल्यु क्र. ३ पंच प्रियंका हिने पंचनाम्यास अनुसरून | — | — |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | साक्ष न देता विसंगत साक्ष दिली.(उदा. एक मुलगी जी बोगस गिऱ्हाईकासमवेत होती तिच्या व्यतिरिक्त इतर सर्व बळीत महिला या अर्धनग्न अवस्थेत होत्या तसेच नमुद कारवाईसाठी पथक ०४.०० वा निघाले असताना नमुद साक्षीदार हिने ०३.०० वा बोगस गिऱ्हाईक हा पार्लरमध्ये गेल्याचे सांगितले.)<br>४) पी. डब्ल्यु क्र. २ राधा चरण चौधरी हे या पार्लरचे मुळ मालक असुन त्यांनी त्यांचे जबाबात त्यांच्या पार्लरमध्ये अनैतिक प्रकार चालु नसल्याने साक्षीमध्ये सांगितले. मा. महादंडाधिकारी यांनी सदर गुन्हयाचे तपासी अधिकारी यानी नमुद पार्लरचे मुळ मालक यांच्या गुन्हयातील भुमिकेबाबत अधिक तपास करणे आवश्यक होते, मुळ मालक यांनी आरोपी यांचेशी दि. | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | ०४/०१/२०१० ते दि. ०३/१२/२०१० असा ११ महिनेचा भाडेकरार केला असुन नमुद भाडेकरारनाम्यासाठी वापलेला स्टॅम्प पेपर हा दि. ०६/०४/२०१० रोजी खरेदी केल्याचे दिसत म्हणजेच करारनामा केल्यानंतर ४ महिन्यांनी खरेदी केल्याचे दिसत असुन तपासी अधिकारी यांनी या बाबत सखोल तपास केलेला नाही. तसेच याबाबत संबंधित आरोपींकडे तपास न करता दोषरोप पत्र दाखल केल्याचे दिसुन येत असल्याचे महानगर दंडाधिकारी यांनी नमुद केले आहे. पोलीसांनी सखोल तपास न केल्याने आरोपींना अशा प्रकारे गुन्हा करूनही गुन्हयापुर्वी सदरचे घटनास्थळ हे भाडयाने दिल्याचे दाखवता आले असल्याचे महानगर दंडाधिकारी यांनी | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | त्यांच्या आदेशामध्ये म्हटले आहे.<br>५) फिर्यादी व इतर साक्षीदार यांच्या साक्ष या विसंगत आहेत.(not Corroborative) | | |
| २ | अंमलबजावणी | १) श्री. राजेंद्र दाभाडे, पोउआ, अंमलबजावणी. (अध्यक्ष)<br>२)सपोआ श्री. तरडे<br>३) प्रभा राउळ, पोनि, समाज सेवा शाखा, (सदस्य)<br>३) श्रीमती. साक्षी लोडत विधी अधिकारी (सदस्य) | १९/०७/१९ | नागपाडा पोलीस ठाणे, स्था.गुनो कं. २२६२/१०, कलम ३,४,५,७ (१) (ब)अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६<br><br>५४००५२७/पीड ब्लयु/११<br>५४ वे न्यायालय, शिवडी, मुंबई निकाल दिनांक ३१/१०/१८ | १)अनिता उर्फ अरूणा अनंत कारंडे<br>२)नजमा अख्तर शेख( Trial separated)<br>ॲफ्ल्युअेंट लेडीज ॲन्ड जेन्टस पार्लर, मुंबई सेंट्रल, मुंबई | १)पोलीसांनी बोगस गिऱ्हाईक नामे प्रकाश यास साक्षकामी मा. न्यायालयात हजर ठेवले नाही. त्यामुळे त्याने पार्लरमध्ये प्रवेश केल्यानंतर प्रत्यक्षात काय घडले हे न्यायालयासमोर आले नाही.<br>२) पी. डब्ल्यु क्र.७ पंच याकुब शेख याने मुख्य तपासणीमध्ये व्यवस्थित साक्ष दिली परंतु उलटतपासणीमध्ये त्याने इतर गुन्हयामध्ये पंच म्हणुन काम केले असल्याचे सांगितले.त्यामुळे त्यांच्या साक्षीवर विसंबुन राहता येणार नाही असे न्यायालयाने | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | नमुद केले.<br>३) पी. डब्ल्यु क्र. ३, स्वतंत्र साक्षीदार चंद्रेश शहा (गिऱ्हाईक) हा फितुर झाला.<br>४) पी. डब्ल्यु क्र. ५ साक्षीदार पुजा गोल्लार हिनेती नमुद पार्लरमध्ये १५ दिवस कामाला होती परंतु नमुद कालावधीमध्ये तिने फक्त ब्युटिशियनचेच काम केले. सदर पार्लरमध्ये काही अनैतिक प्रकार होत असल्याचे तिला माहित पडल्याने तिने नमुद पार्लरमधील नोकरी सोडली होती व ज्या दिवशी छापा पडला त्या दिवशी ती पगार घेण्यासाठी पार्लरमध्ये आली असल्याचे तिने साक्षीमध्ये सांगितले परंतु कोणताही अनैतिक प्रकार स्वत: पाहिल्याचे तिने सांगितले नाही. त्यामुळे तिचे साक्षीवरून घटनास्थळी वेश्याव्यवसाय चालु होता हे सिध्द होत नसल्याचे आदेशात | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | नमुद केले आहे.<br>६) पी. डब्ल्यु क्र. २ पंच बबीता हिने मुख्य तपासणीत व्यवस्थित साक्ष दिली परंतु ती छापा टीमसमवेत बाहेर असल्यामुळे बोगस गिऱ्हाईकाने पार्लरमध्ये प्रवेश करून बळीत मुलीची वेश्याव्यवसायाबाबत मागणी केली तसेच नमुद आरोपीने त्यांना मुलगी पुरविल्याबाबत कोणतीही माहिती नमुद साक्षीदार सांगु शकली नाही. त्यामुळे तिची साक्ष ग्राहय धरली जावु शकत नसल्याने निकालपत्रामध्ये नमुद केले आहे.<br>७) फिर्यादी व इतर साक्षीदार यांच्या साक्ष या विसंगत आहेत. (not Corroborative) | | |

जा.क्र.            /पोउआ/अंमल/२०१९
पोलीस उप आयुक्त (अंमलबजावणी),
गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई
गुन्हे शाखा इमारत, ॲनेक्स—२,
२ रा मजला, पोलीस आयुक्तालय, मुंबई.
दिनाक :—         .०७.२०१९

# **इतिवृत्त**

शासन परिपत्रक क्र. डीपीपी २०१५/प्र.क्र ५१/पोल १०/दि. १७/१०/२०१७ अन्वये गठीत करण्यात आलेल्या समितीची बैठक दि. १९/०७/२०१९ रोजी आमच्या दालनात आयोजीत करण्यात आलेली होती. सदर बैठकीस सदस्य श्री तरडे, सहा.पोलीस आयुक्त अंमलबजावणी, सद्स्य श्रीमती. प्रभा राऊळ. पोलीस निरीक्षक, समाज सेवा शाखा व श्रीमती साक्षी लोडत, विधी अधिकारी हजर होते.

सदर बैठकीत मा. न्यायालयात निर्दोष मुक्त झालेल्या एकूण ०२ खटल्यांचे मा.न्यायालयाने दिलेल्या निकालांच्या प्रतीवरुन चर्चा करण्यात आली. सदर चर्चेत आरोपी निर्दोष सुटण्याची कारणे काय आहेत व त्यास तपासी अधिकारी यांनी हलगर्जीपणा केला आहे काय? यावर चर्चा करण्यात आली.

१) एम.आय.डी.सी पोलीस ठाणे वि.स्था.ख.क्र.४४/२०१०, कोर्ट केस नं. ५४००३१६/पीडब्ल्यु/२०११ मधील कोर्टाच्या आदेशामध्ये असे नमूद केले आहे की, नमूद पार्लरचे मुळ मालकाच्या भुमिकेबाबत तपासी अधिकारी यांनी अधिक तपास करणे आवश्यक होते व मालकाने मागील तारखेचे (Back Date) करारनामा केलेला आहे. त्यामुळे संबंधीत तपासी २) नागपाडा पोलीस ठाणे स्था.ख.क्र.२२६२/२०१०,कोर्ट केस नं ५४००५२७/ पीडब्ल्यु/२०११ या केस मध्ये मा. न्यायालयाने तपासी अधिकाऱ्याविषयी कोणतेही वाईट मत नाही पंरतू सर्व साक्षीदारांच्या जबाब मध्ये एक सुत्रता (Corroboration) नसल्याचे नमूद केलेले असल्याने संबंधीत तपासी अधिकारी यांना ‘समज’ अशी समीतीची शिफारस करण्यात आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| **(साक्षी लोडत )** | **(प्रभा राऊळ)** | **(सुर्यकांत तरडे )** | **(राजेंद्र दाभाडे)** |
| सहा.सरकारी अभियोक्ता तथा विधी अधिकारी | पोलीस निरीक्षक समाजसेवा शाखा | सहा पो.आयुक्त (अंमलबजावणी) | पोलीस उप आयुक्त, (अंमलबजावणी) |
| **सदस्य** | **सदस्य** | **सदस्य** | **अध्यक्ष** |

**प्रत माहिती व कार्यवाही करिता सविनय सादर**
१) मा. अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे), मुंबई
२) मा. पोलीस उप आयुक्त, (प्रकटीकरण), गुन्हे शाखा, गुअवि, मुंबई